**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४०/२०१८-१९/ 252 दिनांक: १२.११.२०१८

19 NOV 2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ४०(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री संतोष रामहरी शिंदे ,<br>मु.पो. शेगांव ता. जत जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय कवठे महांकाळ | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग जत | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

19/11/2018

तक्रारदार श्री संतोष रामहरी शिदे मु.पो. शेगांव ता. जत जि. सांगली यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंप वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक ११.०९.२०१८ रोजी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेतीसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज दिनांक २८.०७.२०१७ रोजी वि.प. यांचेकडे सादर केलला आहे. अद्याप पर्यन्त कोटेशन न मिळालेमुळे पैसे भरलेले नाहीत. त्यांना वीज जोडणी अद्यापपर्यन्त मिळाली नाही . शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याची खुपच गैरसोय होत आहे. म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनांक ३०.०६.२०१८ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२.११.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार यांनी दिनांक १२.११.२०१८ रोजी ई-मेलद्वारे आर्थिक कारणास्तव सुनावणीस उपस्थित होऊ शकत नसल्याचे कळविले आहे. तसेच त्यांनी मंचास अशी विनंती केलेली आहे की, मला लवकरात लवकर शेतीसाठी विज पुरवठा मिळावा अशी त्यांची मागणी त्यांनी या ई-मेलद्वारे विनंती केलेली आहे. वि.प.कंपनीतर्फे कोणीही उपस्थित राहिलेले नाही अथवा त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही.

या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**कारणमिमांसा**

नविन वीज जोडणी लवकरात लवकर अशी विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. नवीन विज जोडणीचा अर्ज आल्यानंतर विज जोडणी देण्याच्या प्रत्येक प्रक्रियेकरिता कृती मानके विनिमयांमध्ये विहीत कालावधी नेमस्त केलेला आहे. त्याचे उल्लघंन झाल्यास, दंडाची तरतूद करण्यांत आलेली आहे. विज जोडणी देण्याकरिता येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक (Estimate) देण्याकरिता देखील कालावधी नमूद केलेला आहे व त्यांचे पालन न झाल्यास दंडाची तरतूद आहे. वि.प. कंपनीने , तक्रारदाराचा नविन विज जोडणीचा अर्ज दाखल करण्यांत आलाच नाही अशी भुमिका घेतलेली नाही. तक्रारदारांस अद्याप पावेतो अंदाजत्रक का दिलेले नाही त्याचे देखील कारण दिलेले नाही.

दिनांक २८.०७.२०१७ रोजी नविन विज जोडणी करीता अर्ज दाखल होऊन ही आजतागायात तक्रारदारांस नविन विज जोडणी देण्यांत आलेली नाही ही बाब स्वयंस्पष्ट आहे.

14/11/2018

सबब तक्रारादाराचा अर्ज मंजूर करुन, त्यांस एका विशिष्ट मुदतीत नविन विज जोडणी देण्याचा आदेश पारीत करावा लागेल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. सबब आम्ही खालील आदेश पारीत करत आहोत.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदारास हया आदेशाचे तारखेपासून १५ दिवसांत खर्चाचे अंदाजपत्रक देऊन , त्यातील रक्कम त्या पुढील ७ दिवसांत भरुन घेऊन पैसे भरल्याचे तारखेपासून १ महिन्याचे आत तक्रारदारास नविन विज जोडणी द्यावी असा आदेश पारीत करण्यांत येत आहे.

३) आदेशाची पुर्तता झाल्याचे, हया आदेशाचे तारेखेपासून २ महिन्यांत हया मंचाला वि.प. कंपनीने कळविण्याचे आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

12/11/18 | | 12/11/2018
---|---|---
( पी.एस. पुजारी) | (एन.बी. बारसिंग) | (ए.व्ही. देशपांडे)
ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण